# राष्ट्रपती राजवट

## ❖ राष्ट्रपती राजवट म्हणजे काय ?




- विधानसभा निवडणूकीनंतर एखाद्या राज्यामध्ये घटनात्मक सरकार स्थापन झाले नाही तर राज्यपाल राज्यघटनेच्या भाग १८ मधील कलम **३५६ नुसार** राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस करु शकतात.

- राष्ट्रपतींकडून ती शिफारस केंद्रीय गृह मंत्रालयाकडे पाठवली जाते आणि केंद्रीय मंत्रिमंडळात त्यावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या सहीने तसा आदेश जारी केला जातो.

## ❖ राष्ट्रपती राजवटीत सर्व अधिकार कोणाकडे असतात ?

**राष्ट्रपती राजवट लागू झाल्यानंतर राज्याचे सर्व अधिकार केंद्राचा प्रतिनिधी म्हणून राज्यपालांकडे एकवटतात.**




## ❖ या काळात विधानसभेचे काय होते ?

- राष्ट्रपती राजवटीच्या कालावधीत विधानसभा निलंबित अवस्थेत राहते. ती स्थापनही झाली नसेल तर तिचे गठनही निलंबित राहते.

## ❖ राज्यपाल कसा कारभार करतात ?

- राज्यपालांच्या मदतीसाठी तीन सनदी अधिकारी सल्लागार म्हणून काम करतात. राज्याचे सर्व प्रशासन राज्यपालांच्या अधिकार कक्षेत येते. विधानसभा जे कायदे करते ते कायदे संसदेत केले जातात. (नूकतेच जम्मू - काश्मीरमध्ये हे घडले)

# संविधानानुसार राष्ट्रपती राजवट कधी लागू केली जाते ?

- ❖ कलम ३५६ नुसार : एखाद्या राज्यातील कारभार संविधानातील तरतुदींनुसार चालवता येत नसल्याचा राज्यपालने अहवाल दिल्यास किंवा राष्ट्रपतीला स्वत: तसे वाटल्यास (Suo moto)

- ❖ कलम ३६५ नुसार : एखाद्या राज्याने केंद्राच्या सूचना अंमल करण्यास असमर्थता दर्शवल्यास

## राष्ट्रपती राजवट व्यवहारात कधी लागू करतात ?

- कोणत्याही पक्षाला बहुमत न मिळाल्यास
- सरकार ने बहुमत गमावल्यास
- सरकार विरोधात अविश्वास दर्शक ठराव सम्मत झाल्यास
- वांशिक वाद, दंगली अशा कारणामुळे कायदा सुव्यवस्था धोक्यात आल्यास

## ❖ राष्ट्रपती राजवट लागू कोण करते ?

राष्ट्रपती घोषणा करतात /त्यांची खात्री पटल्यास



## राष्ट्रपती राजवट किती दिवसासाठी लागू करता येते ?

- **जास्तीत जास्त ३ वर्षासाठी**
- पण दर ६ महिन्याला संसदेची नवीन मान्यता मिळवणे आवश्यक असते
  - १ वर्षापेक्षा जास्त काळ राष्ट्रपती राजवट ठेवायची असल्यास २ अटी राष्ट्रीय आणीबाणी (कलम ३५२ अंतर्गत लागू असलेली पाहिजे)
  - २. राज्यात निवडणूक घेणे अशक्य असल्याचे निवडणूक आयोगाने प्रमाणित केले तर (दोन्ही अटी ४४ व्या घ. दु. नुसार)

## मान्यता कुणाची लागते ?

- राष्ट्रपती राजवट लागू झाल्यानंतर **२ महिन्याच्या आत संसदेची** ( दोन्ही सभागृहाची ) मान्यता गरजेची
- या दरम्यान लोकसभा विसर्जित असल्यास राज्यसभेची मान्यता घेऊन ठेवता येते आणि लोकसभा गठीत झाल्यावर तीची ३० दिवसाच्या आत मान्यता मिळवणे बंधनकारक

## माघारी घेता येते का ? होय

- राष्ट्रपतीला हा अधिकार (संसदेची मान्यता लागत नाही)
- कोणत्याही राजकीय पक्षाच्या सत्तास्थापनेच्या दाव्या बाबत राज्यपालाची खात्री पटल्यास तो राष्ट्रपतीला राष्ट्रपती मागे घेण्याची शिफारस करु शकतो.

## विविध समित्यांचे म्हणणे ?

- **बाबासाहेब आंबेडकर** : मृत पत्र (dead letter) असावे अशी अपेक्षा
- **सरकारीया आयोग** : सर्वात शेवटचा पर्याय म्हणून वापर करावा
- **बोमई खटला** : (१९९४) ३५६ चा गैर वापर टाळण्यासाठी बरोबर वापर आणि चुकाचा वापर यासाठीचे तत्वे सांगण्यात आली

## परिणाम काय होतो ?

- १) **मंत्रीमंडळावरती** : मंत्री मंडळ नसते / असेल तर बरखास्त केले जाते मंत्र्यांना / आमदारांना कोणतेही हक्क नाहीत/ पालक मंत्री पण नसतो
- २) **विधानसभेवरती** : निलंबित (Suspended Animation) राहते / किंवा बरखास्त केली जाऊ शकते / या दरम्यान कोणतेही अधिवेशन नाही.
- ३) **प्रशासनावरती :** प्रशासनाची (मुख्य सचिवाची) भूमिका वाढते
- ४) **मूलभूत अधिकारांवरती** : कोणताही परिणाम होत नाही.
- ५) **उच्च न्यायालयाच्या** : अधिकारावरती कोणताही परिणाम नाही

### ❖ राजवटी दरम्यान कारभार कोण पाहते ?

- राष्ट्रपती च्या हातात सर्व अधिकार एकवटतात त्यांच्या वतीने राज्यपाल किंवा त्याने निर्देशित केलेली व्यक्ती
- व्यवहारात : **राज्यपाल ३ सनदी** अधिकाऱ्यांच्या सहाय्याने कामकाज पाहतो
- कायदे करण्याचा अधिकार : संसदेकडे delegate करता येतो.

## सर्वोच्च न्यायालयाची भूमिका काय ?

राष्ट्रपतींची खात्री चुकीच्या हेतूवर (malafide) आधारित आहे या सबबी साठी सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपती राजवट हटवण्याचे आदेश देऊ शकते. उदा. उत्तराखंड राज्य (२०१६)

## भारतातील राष्ट्रपती राजवटीचा इतिहास : पंतप्रधान आणि राष्ट्रपती राजवट

इंदिरा गांधी ५०

मोरारजी १५

मनमोहन सिंग १२

नरसिंहराव ११

नेहरु ८

चंद्रशेखर ५

वाजपेयी ५

नरेंद्र मोदी ५

सर्वाधिक काळ : पंजाब (एकूण दिवस)

सर्वाधिक काळ : जम्मू काश्मीर (सलग एकाच वेळी)

| | |
|---|---|
| आजवर एकूण किती वेळा राष्ट्रपती राजवट ? | जवळपास १३१ |
| सर्वाधिक वेळा राष्ट्रपती राजवट लागू होणारे राज्य ? | मणिपूर |
| कधीही राष्ट्रपती राजवट न लागू होणारे राज्य ? | छत्तीसगड आणि तेलंगणा |
| सर्वात पहिली राष्ट्रपती राजवट | पंजाब (१९५१) |

# महाराष्ट्रातील राष्ट्रपती राजवटीचा इतिहास : ३ वेळा

## कधीपासून ते कधीपर्यंत

- १७ फेब्रुवारी १९८० ते जून १९८० (११२ दिवस)
- २८ सप्टेंबर २०१४ ते ३० ऑक्टोबर २०१४ (३२ दिवस)
- १२ नोव्हेंबर २०१९ पासून

## इतर माहिती

- शरद पवार यांचे पुलोद सरकार केंद्रातील इंदिरा गांधी सरकारने हटवले.
- पृथ्वीराज चव्हाण यांच्या सरकारचा राष्ट्रवादीने पाठिंबा काढला
- बहुमताद्वारे सरकार स्थापन करण्याचा दावा करण्यात भाजप / शिवसेना आणि नंतर राष्ट्रवादी अपयशी ठरले.

## ❖ राष्ट्रपती राजवटीचे राजकीय 'हत्यार'

- ❑ राज्यांत कलम ३५६ नुसार राष्ट्रपती लागू करण्यात येते. राष्ट्रपती राजवट ही राज्यघटनेतील तरतूद असली, तरी सर्वच सरकारांकडून त्याचा राजकीय वापरच सर्वाधिक प्रमाणात झाला आहे.
- ❑ सध्या महाराष्ट्रातही निर्माण झालेल्या राजकीय पेचामुळे राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर देशभरातील आतापर्यंतच्या राष्ट्रपती राजवटीचा आढावा.



# राज्यनिहाय राष्ट्रपती राजवटींची संख्या

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | मणिपूर | ०९ | उत्तर प्रदेश | ०८ | बिहार | ०८ | जम्मू आणि काश्मीर |
| ०८ | पंजाब | ०६ | कर्नाटक | ०६ | ओडिशा | ०६ | पुदुच्चेरी |
| ०५ | गोवा | ०५ | गुजरात | ०५ | तामिळनाडू | ०४ | आसाम |
| ०४ | केरळ | ०४ | नागालँड | ०४ | राजस्थान | ०४ | पश्चिम बंगाल |
| ०३ | आंध्र प्रदेश | ०३ | हरियाणा | ०३ | झारखंड | ०३ | मध्य प्रदेश |
| ०२ | हिमाचल प्रदेश | ०२ | मेघालय | ०२ | सिक्कीम | ०२ | उत्तराखंड |
| ०१ | दिल्ली | (या शिवाय तत्कालीन पतियाळा व पूर्व पंजाब त्रावणकोर - कोचीन आणि दिव्य प्रदेशामध्येही प्रत्येकी एकच राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती.) | | | | | |

## महाराष्ट्रातील राष्ट्रपती राजवट

- १) १७ फेब्रुवारी १९८० ते जून १९८०
- २) २८ सप्टेंबर २०१४ ते ३१ ऑक्टोबर २०१४
- ३) १२ नोव्हेंबर २०१९ पासून

# मोदींच्या राजवटीत चार राज्यांत राष्ट्रपती राजवट




❖ **जम्मू आणि काश्मीर :**

- भाजपने राज्यात पीडीपीने दिलेला पाठिंबा काढून घेतल्यानंतर मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनी राजीनामा दिला होता. त्यामुळे, २०१७ मध्ये राष्ट्रपती राजवट. २०१५ मध्येही राष्ट्रपती राजवट.

❖ **अरुणाचल प्रदेश :**

- काँग्रेसच्या २१ आमदारांनी भाजपच्या ११ आणि दोन अपक्ष आमदारांशी हातमिळवणी केल्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर २०१६ साली राष्ट्रपती राजवट.

❖ **उत्तराखंड :**

- राज्यातील काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर २०१६ मध्ये प्रत्येकी **२५ आणि १९** दिवसांसाठी दोनदा राष्ट्रपती राजवट.

❖ **महाराष्ट्र :**

- राष्ट्रवादी काँग्रेस तत्कालीन सरकारमधून बाहेर पडल्यांनतर २०१४ साली **३३ दिवसांसाठी** राष्ट्रपती राजवट. त्यांनतर पुन्हा नुकतेच २०१९ च्या निवडणूक निकालानंतर कोणत्याही पक्षाने सत्ता स्थापन न केल्याने राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे.

❖ **१३१**

- **आतापर्यंतच्या राष्ट्रपती राजवटींची एकूण संख्या**